# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

2417124
5:00

दिनांक : २४/०७/२०२४

# प्रेसनोट

आज दिनांक २४/०७/२०२४ रोजी मा. प्रशासक तथा आयुक्त डॉ. अझीझ शेख यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त जमीर लेंगरेकर व किशोर गवस यांच्या सूचनेनुसार उप-आयुक्त डॉ. सुभाष जाधव व भांडार विभाग प्रमुख अंकुश कदम यांनी उल्हासनगर-१ मधील गुलशन नगर, कलानी कॉलेज, कोणार्क रेसिडन्सी, शहाड फाटक येथील नाला व खन्ना कंपाऊन्ड, शांती नगर येथील नाला तसेच उल्हासनगर शहरातील काही नाल्यांची पाहणी केली असता कुठेही पाण्याची पातळी वाढल्याचे दिसून आले नाही. उल्हासगनर शहरात सकाळ पासून मुसळधार पाऊस पडत असल्याने खबरदारी म्हणून नाल्यांच्या किनारी राहणाऱ्या सर्व नागरिकांना सुरक्षित स्थळी स्थलांतरीत होणेबाबतच्या सूचना देण्यात आल्या.

पप्पू गार्डन, फॉल्वर लाईन रोड, उल्हासनगर-५ येथील रस्त्यावर गुलमोहर झाडाची मोठी फांदी पडली होती. गोपाळ कृष्ण नगर, गुड्डू गॅरेज समोर विठ्ठलवाडी, उल्हासनगर-३ येथे व माजी महापालिका सदस्या श्रीमती मीना सोंडे यांच्या घराजवळ झाड पडले, तसेच उल्हासनगर-४ येथील कुर्ला कॅम्प परिसरात चार चाकी वाहनावर झाड कोसळले. वाहनाचे नुकसान झाले असून कोणतीही जिवीत हानी झालेली नाही. वरील सर्व झाडे काढण्याचे काम अग्निशमन विभागामार्फत करण्यात आले आहे. यावेळी प्रभारी अग्निशमन अधिकारी सुरेश बोंबे हे प्रत्यक्ष पाहणी करून कार्यवाही करीत होते.

पावसामुळे होणाऱ्या नुकसानीस महानगरपालिकेची अग्निशमन यंत्रणा, आपात कालीन यंत्रणा, भांडार विभाग तसेच संबंधीत यंत्रणा वेळोवेळी बचावाचे कार्य करीत आहे.

24/7/24

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – माहितीस्तव.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.
१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
- सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.

Scanned with CamScanner